मोठ्या आशा, आकांक्षा, अपेक्षा नि मोठी ध्येये

किती कष्ट, वेळ, पैसा आणि मनाचे धागे-दोरे

दैनंदिन आयुष्यातील धावपळ आणि कधी घुसमट

माणसांशी संबंध जोडणे, तोडणे, आणि बिघडवणे

दिवस-रात्र काळजी, चिंता, खंत, क्षणन् क्षण गुंतवणे.

पण,

किती छोट्या छोट्या गोष्टी घडतात घरात आणि भोवती

मुले वाट पाहत असतात घरी नि आर्थ हाक मारताच भेटताच

आवडत्या पदार्थांच्या जेवणात किती समाधान, किती आनंद

छोटीशी निर्मिती, कौतुक, निसर्गाचे विभ्रम डोळयांत  भरून

तात्कालिक गारांसारखे येणारे आनंदक्षण वेचायचे जातात राहून!

१३.१.२०१९

---